## रयत शिक्षण संस्थेचे,
## कला व वाणिज्य महाविद्यालय, माढा
## टेंडर नोटीस

रयत शिक्षण संस्थेचे कला व वाणिज्य महाविद्यालय, माढा ता.माढा जि.सोलापूर हे PM-USHA योजनेंतर्गत CCTV खरेदीसाठी निविदा मागवत आहेत. सदर निविदासंदार्भातील अटी व शर्थी www.accmadha.com या वेबसाईटवर प्रसिद्ध केलेल्या आहेत.

सही

प्राचार्य

कला व वाणिज्य महाविद्यालय, माढा

Rayat Shikshan Sanstha

**ARTS AND COMMERCE COLLRGE MADHA.**

**Dist. Solapur PIN 413209**



# जाहीर निविदा सूचना, सन २०२४-२५

महाविद्यालयास PM-USHA योजनेमधून CCTV कॅमेरा व तद्नुषंगिक आवश्यक साहित्य पुरवठा करणे, बसविणे, यंत्रणा कार्यान्वित करणे आणि ०३ वर्ष देखभाल व दुरूस्ती करणे, या कामासाठी पात्र पुरवठादारांकडून निविदा मागविण्यात येत आहेत. सदरची निविदा पक्रिया लिफाफा (Envelope/ Covers) पध्दतीने राबविण्यात येत आहे.

सदर निविदेचा तपशील, नियम व अटी खालीलप्रमाणे आहेत.

| अ. क्र. | वस्तूचा तपशील | नगसंख्या | दर रू. | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | Hikvision 4mp ip dome camera DS-2CD1343G0-I | ४४ | | |
| २ | Hikvision 4mp ip bullet camera DC-2CD1043G0-I | २० | | |
| ३ | Hikvision 64ch 4 sata NVR I4DS-7764NI-M4 | ०१ | | |
| ४ | Hikvision 24 Port POE switch DS-3E0526P-E/M | ०२ | | |
| ५ | Hikvision 8 port POE switch DD-3E0109P-E/M | ०२ | | |
| ६ | D link cat 6 cabel mtr | १५२५ | | |
| ७ | D link RJ45 connector 200 | १५० | | |
| ८ | Hikvision 4mp PTZ camera DS-2DE4425IW-DE | ०२ | | |
| ९ | PVC box 5X5 | ६४ | | |
| १० | WD 10 TB hdd | ०२ | | |
| ११ | ५६ '' Disply | ०१ | | |
| १२ | Fitting installation charges + 1 year including visit charges | ६४ | | |

**<u>नियम, अटी व शर्ती-</u>**

१. सदरची संपूर्ण निविदा लिफाफा (Envelope/ Covers) पध्दतीने संगणकीय प्रणालीवर होईल. सदर निविदे संदर्भातील निविदा सूचना प्रसिध्दी, शुध्दीपत्रके इ. माहिती महाविद्यालयाच्या www.accmadha.com या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येतील.

२. सदर निविदा दि.०४/०१/२०२५, सका. ११.०० वा. पासून ते दि१०/०१/२०२५, सांय. ०५.०० वा. पर्यंत महाविद्यालयामध्ये बंद लिफाफा पध्दतीने सादर करण्यात यावी.

३. निविदा धारकाने प्रसिध्द केलेल्या संपूर्ण निविदेचे, शुध्दीपत्रकांचे (आवश्यकतेप्रमाणे प्रसिध्द झाल्यास) काळजीपूर्वक वाचन करूनच निविदा भरावी.
४. सी.सी.टी.व्ही. यंत्राणा साहित्याचा तांत्रिक तपशील (Technical Specifications) निविदा दस्तऐवजातील Annexure-I, Technical Specifications of CCTV Surveillance System प्रमाणे आहे. सदरच्या निविदेमध्ये सहभागी होणाऱ्या निविदाकारांनी त्याप्रमाणे अचूक पुर्तता होत असल्याची खात्री करूनच निविदा भरावी. अन्यथा निविदा अपात्र ठरविण्यात येईल याची नोंद घ्यावी.
५. निविदेमध्ये सहभागी होणाऱ्या निविदाकाराने (Bidder) संस्था/फर्म कायदेशीर नोंदणी प्रमाणपत्र, आयकर नोंदणी क्रमांक (PAN), मागील ०३ वर्षाचे आयकर विवरणपत्र (ITR), जी.एस.टी. नोंदणी प्रमाणपत्र, निविदेसोबत आवश्यक आहे.
६. सी.सी.टी.व्ही. यंत्राणा साहित्य निर्माता (OEM) कंपनीने निविदा क्रमांक नमूद असलेले निविदाकार प्राधिकृत केलेचे प्रमाणपत्र (Manufacturer Authorisation Letter), पुरवठा करण्यात येणाऱ्या संपूर्ण सी.सी.टी.व्ही. यंत्राणा साहित्याचे माहितीपत्रक (Data Sheet), Annexure -I, Technical Specifications of CCTV Surveillance System प्रमाणे सर्व आवश्यक प्रमाणपत्रे आणि सर्व तांत्रिक बाबींची पूर्तता होत असलेबाबतचे घोषणापत्र, सर्व्हिस सेंटर, प्राधिकृत कर्मचारी/अधिकारी संपर्क तपशील व टोल फ्री नंबर याबाबतचे प्रमाणपत्र, ०३ वर्षाचे देखभाल, दुरूस्ती व वॉरंटी हमीपत्र निविदेसोबत आवश्यक आहे.
७. अंतिमत: पात्र ठरलेल्या निविदाकारास नियमानुसार पुरवठा आदेश देण्यात येईल, त्या पुरवठा आदेशातील सर्व नियम, अटी व शर्तीचे पालन करणे बंधनकार असेल.
८. पुरवठा आदेश स्विकारल्यानंतर नियमानुसार योग्य किंमतीच्या मुद्रांकावर करारनामा करणे आवश्यक असून करारनाम्यातील सर्व नियम, अटी व शर्तीचे पालन करणे बंधनकार असेल. मुद्रांक शुल्क व करारनामा खर्च पुरवठादारास भरावा लागेल.
९. पुरवठा आदेश स्विकारल्यानंतर नियमानुसार पुरवठा आदेशातील रक्कमेच्या ३% पेक्षा कमी नसेल एवढया रक्कमेची ०३ वर्ष मुदतीची बँक गॅरंटी सादर करणे आवश्यक राहील.
१०. सी.सी.टी.व्ही. यंत्राणा बसविण्यासाठी शाळेची संख्या व यादी आर्थिक तरतूद विचार घेऊन निश्चित केलेनंतर पात्र ठरलेल्या पुरवठादारास उपलब्ध करून देण्यात येईल.
११. सी.सी.टी.व्ही. यंत्राणा शाळेत बसविणे व कार्यान्वित करणे यासाठीचा कालावधी पुरवठा आदेश स्विकारलेपासून १५ दिवस इतका राहील.
१२. कोणतीही सर्शत / अपूर्ण निविदा स्विकारली अथवा विचारात घेतली जाणार नाही.
१३. आवश्यकतेप्रमाणे सदर निविदेमधील अटी व शर्तीमध्ये बदल करणे, कोणतीही पूर्वसूचना न देता सदर निविदा प्रक्रिया संपूर्ण अथवा अंशत: रद्द करणे, अथवा निविदेच्या कोणत्याही टप्प्यावर आवश्यकतेप्रमाणे योग्य ते निर्णय घेणे, याबाबतचे संपूर्ण अधिकार **प्राचार्य, कला व वाणिज्य महाविद्यालय, माढा** यांनी राखून ठेवले असून सर्व निर्णय निविदाकार यांना बंधनकारक राहतील.
१४. सदर निविदा प्रक्रियेसंदर्भात कोणताही वाद उद्‌भल्यास न्यायालयीन कार्यक्षेत्र सोलापूर राहील.

**अ) लिफाफा (Envelope):-**

१) निविदा धारकांने निविदा भरताना आवश्यक ती सर्व कागदपत्रे **बंद** लिफाफ्यामध्ये सादर करावीत.
२) निविदा धारकाने प्रसिध्द केलेल्या संपूर्ण निविदेचे, शुध्दीपत्रकांचे (आवश्यकतेप्रमाणे प्रसिध्द

झाल्यास) काळजीपूर्वक वाचन करूनच आवश्यक ती सर्व कागदपत्रे सादर करण्यात यावी.

३) निविदा धारकाने दर नमूद करताना सी.सी.टी.व्ही. यंत्राणा साहित्याची किंमत, यंत्रणा शाळेत बसविणे, कार्यान्वित करणे, आणि ०३ वर्ष देखभाल व दुरूस्ती करणे, या सह सर्व कर, शुल्के व इतर तद्नुषंगिक खर्च समावेशक असलेले दर नमूद करावेत.

४) एकदा दर निश्चित झालेनंतर कोणत्याही प्रकारचा अधिकचा खर्च अनुज्ञेय असणार नाही. अथवा देय असणार नाही., त्यामुळे दर नमूद करताना काळजीपूर्वक व सर्व बाबींचा समावेशक विचार करूनच दर नमूद करावेत.

दिनांक: ०४/०१/२०२५

स्थळ: माढा

**प्राचार्य,**
**कला व वाणिज्य महाविद्यालय, माढा.**
**जि. सोलापूर.**